# १९९० नंतरचे भारतीय राजकारण

श्री. प्रविण अरूण पोवार, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

........................................................................................................

**प्रास्ताविक**

भारत स्वातंत्र्योत्तर काळात १९५२ ते १९९० पर्यंत झालेल्या भारतीय राजकारण भारत स्वातंत्र्यानंतरची पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५१—५२ साली झाली. भारतातील सुरूवातीच्या तीन दशकातील राजकारणाचा प्रवास कॉंग्रेसच्या एक पक्ष वर्चस्वाचा राहीला. स्वातंत्र्य चळवळीचा वारसा, सर्वसमावेशकाची भूमिका आदी गोष्टीमुळे हा लाभ मिळाला. १९७० व १९८० च्या दशकात कॉंग्रेसने आपली समाजवादी प्रतिमा भक्कम करण्याचा प्रयत्न केला. गरीबी हटाव, सार्वजनिक क्षेत्राची वाढ, जमिनीच्या मालकीवर मर्यादा, बॅंकांचे राष्ट्रीयीकरण इत्यादी कार्यक्रमांच्या कार्यवाहीतून कॉंग्रेस पक्ष मजबूत करण्याचा प्रयत्न केला. हे तत्कालीन काळात कॉंग्रेससमोर उभा राहिलेल्या बिगर कॉंग्रेसवाद, पक्षांतर्गतमतभेदअशाआव्हानांनाचोख प्रत्युत्तरहोतेअसेम्हटल्यासवावगेठरणारनाही. मात्र जून १९७५ च्या राष्ट्रीय आणीबाणीच्या निर्णयान इंदिरा गांधीनी सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केला. परिणामी विरोधीपक्षांनी जनमत बदलाच्या भांडवलावर १९७७ मध्ये कॉंग्रेसची सत्ता उलथवून लावली आणि १९६७ च्या निवडणूकीतील इंदिरागांधींचे स्पर्धक मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्ष प्रणित आघाडी सरकार सत्तारूढ झाले. पण या सरकारमध्ये देखील अंतर्गत सत्तेची ओढाताण होतीच कारण यांच्याकडे कोणतीही निश्चित दिशा, नेतृत्व व समान कार्यक्रम नव्हता. त्यामुळे या सरकारला लवकरच सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. पुढे कॉंग्रेसने दोन्ही निवडणूकांत बहुमत मिळवून सरकार निर्माण केले आणि पुन्हा एकदा भारतीय राजकारणातील आपले वर्चस्व सिद्ध केले. परंतु १९९० नंतर काही महत्त्वपूर्ण बदलामुळे भारतीय राजकारणाला नवदिशा प्राप्त झाली.

**१९९० नंतरचे भारतीय राजकारण :** नवपरिवर्तनाचा प्रवाह हा १९९० नंतर बदलून त्याला नवीन वळण मिळाले. गेल्या अडीच दशकात काही महत्त्वपूर्ण घटनांमुळे भारतीय राजकारणात नवपरिवर्तने घडून आली आणि भारतीय राजकारणात अस्थिरता निर्माण झाली. या घटनांचे आणि बदलांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

१९९० नंतर भारतीय राजकारणातील कॉंग्रेसचे वर्चस्व कमी झाले हा पहिला बदल निदर्शनास येतो. सर्वसाधारणपणे १९७८ ते ८० हा कालावधी वगळता १९९० पर्यंत कॉंग्रेसची भारतीय राजकारणात मजबूत पकड होती. ही पकड १९९० नंतर कमी झाली. कॉंग्रेस पक्षाचे कुटूंबप्रमुख —इंदिरागांधी त्यानंतर राजीवगांधी यांची हत्या, पक्षांतर्गत मतभेद व फाटाफूट इत्यादी कारणास्तव कॉंग्रेसची हानी झाली. मात्र १९९१ च्या मध्यावधी निवडणूकीमध्ये सहानूभूतीच्या आधारावर कॉंग्रेसला आपली सत्ता पुन्हा स्थापन करता आली. पुढील काळात कॉंग्रेसला काही घटक पक्षांना सोबत घेवूनच संयुक्तपुरोगामी आघाडीच्या नावानेसत्तेत बसाव`लागले. दुसरी घटना, राष्ट्रीय राजकारणात १९९० नंतर 'मंडल' मुद्याने प्रवेश करून भारतीय राजकारणाला एक नवे वळण दिले. खरेतर १९८० च्या दशकात जनतादलाने इतरमागासवर्गामध्ये पाठिंबा असणाऱ्या गटांना एकत्रीत आणले. यामुळे इतरमागासवर्गीयांच्या राजकारणास संघटीत रूप येण्यास मदत मिळाली आणि १९९० ला राष्ट्रीय आघाडी सरकारने मंडल आयोगाच्या शिफारसी स्वीकारून 'इतरमागासवर्गीयांच्या' आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आणला. त्यामुळे ओ.बी.सी. आरक्षण आणि राजकारण याभोवती भारतीय राजकारण फिरू लागले. पुढे या मोठयावर्गाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी राजकीय पक्षांनी सत्तेमध्ये त्यांना वाटा देण्याची महत्त्वाची भूमिका बजावली.

तिसरी घटना अथवा बदल भारतीय राजकारणाला १९९० नंतर एका नव्या वळणावर आणून बसविण्यासाठी जबाबदार राहिली ती म्हणजे अयोध्या प्रकरण, जनसंघाच्या समर्थकांनी १९८० मध्ये निर्माण केलेल्या भारतीय जनतापक्षाने हिंदूराष्ट्रवादाच्या तत्त्वांवर जोर देवून 'हिंदूत्वाचा' राजकीय मार्ग निवडला आणि हिंदूंना संघटित करण्याचे धोरण अंगीकारून जमातवादाच`राजकारण केले. म्हणजेच या काळात धार्मिक अस्मितेवर आधारित राजकारणाचा उदय झाला. भाजपाने हिंदुत्व आणि राममंदिर या मुद्यांचा वापर करून १९९८ व १९९९ मध्ये एका आघाडीचा( रालोआ) प्रमुख पक्ष म्हणून पुढे आला.पण गेल्या दशकातील दोन्ही निवडणूकांमध्ये या पक्षाला आलेल्या अपयशामुळे विरोधी पक्षाच्या बाकावर बसावे लागले. २०१४ च्या निवडणकीत भाजपलामोदींच्या प्रभावामुळे अनपेक्षित असे बहुमत मिळाल्याने पुन्हा सरकार निर्माण करण्याची संधी मिळाली आणि पुनश्च: पक्षाची ताकदसिद्ध करून दाखवली.

चौथा बदल विविध प्रादेशिक पक्षांचा उदय आणि त्यांचा प्रभाव हा एक दुरगामीबदल १९९० नंतरच्या भारतीय राजकारणात पहायला मिळतो. राष्ट्रीय राजकारणाची दिशा बदलण्यामध्ये प्रादेशिक पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरली. गेल्या दोनदशकात कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला बहुमत मिळवता न आल्याने त्यांनी प्रादेशिक पक्षांना सोबत घेवून सरकारे स्थापली. यामुळे राष्ट्रीय पक्षांचे बळ कमी होवून प्रादेशिक पक्षांचे बळ वाढलेले दिसते. त्याचबरोबर राष्ट्रीय प्रश्नांची जागा कुठेतरी प्रादेशिक प्रश्नांनी घेतल्याचे जाणवते. म्हणजेच जात, धर्म, वंश, प्रदेश या पूरतेच मर्यादीत राहिली. अशा भिन्न घटकांच्या आधारावर प्रादेशिक पक्षाने आपली मोट बांधली आणि राष्ट्रीय राजकारणाला पोखरण्याचे काम केले. शिवसेना, द्रमुक, अण्णाद्रमुक, तेलगूदेसम ,तृणमूल कॉंग्रेस, बिजू जनता दल, आदि पक्षांनी प्रादेशिक अस्मितांचे राजकारण करून भारतीय राजकारणात आपली प्रतिमा अथवा प्रभाव दाखवून दिला. शिवाय प्रादेशिक नेतृत्वाची जडणघडण (ममता बॅनर्जी, जयललिता इ.) होवून राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाचा प्रभाव कमी झाला असे म्हणता येईल. भारतीय राजकारणातील प्रादेशिक पक्षांच्या वाढत्या भूमिकेमुळे केंद्रशासन आणि राज्यशासन यामध्ये वेळोवेळी विसंवाद निर्माण झाले. परंतु २०१४ च्या निवडणूकीत भाजपला बहुमत मिळाल्याने भारतीय राजकारणातील प्रादेशिक पक्षांचा प्रभाव कमी होण्याची शक्यता नाकारता येतनाही. तसेच राष्ट्रीय पक्षांचे प्राबल्य किंवा महत्व या ठिकाणी अधोरेखित झाल्याचे दिसते. १९९० नंतर भारतीय राजकारणात पाचवे परिवर्तन पाहायला मिळते, ते म्हणजे आघाडी सरकारची संकल्पना या ठिकाणी रूजली आणि त्याचा विस्तार होत गेला. खरेतर १९७८ ला केंद्रामध्ये आघाडी सरकारला प्रारंभ झाला. पण त्याचा विस्तार हा १९८९ नंतर झालेला दिसतो. अलिकडील अडीच दशकाचा विचार केल्यास अनेक आघाडी सरकारे निर्माण झाली. पण २०१४ निवडणूकीत भाजपला बहुमत मिळाल्याने आघाडी सरकारच्या संकल्पनेला धक्का बसला, असे म्हणावे लागेल. आजपर्यंत निर्माण झालेली आघाडी सरकारे त्या पैकी बहुतांशी सरकारे अल्पकाळासाठी सत्तेवर राहिली. उदा. व्ही. पी.सिंगांचे राष्ट्रीय आघाडी सरकार, देवेगौडा किंवा गुजराल यांचे संयुक्त आघाडी सरकार. बहुमताच्या अभावी अनेक राजकीय पक्षांना सोबत घ्यावे लागते. परिणामी विविध विचारांचे व हितसंबंधाचे पक्ष एकत्र आले की, त्याचा प्रतिकूल परिणाम हा निर्णयप्रक्रियेवर होतो. आघाडी सरकारमुळे बहुपक्ष पद्धती बळकट होते हे चांगले लक्षण असले तरी याउलट नकारात्मक परिणाम देखील आहे. गेल्या दोन दशकात भारतीय राजकारणात दोन मुख्य आघाडी सरकारे— कॉंग्रेस प्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) आणि भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकार आकाराला आलेली आहेत व अदला बदलीने सत्तेवर येवून भारतीय राजकारणाची दिशा बदलण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली.

भारतीय राजकारणात १९९० नंतर झालेल्या नवबदलामुळे भारतीय राजकारणाची घुसळण झाली. कॉंग्रेसची उतरंड, मंडल आयोग—आरक्षण व राजकारण, धर्मआधारित राजकारणाची घुसखोरी, प्रादेशिक पक्षांचे वाढलेले प्राबल्य आणि त्यामुळे निर्माण झालेली आघाडी सरकारे या सर्व घटनामुळे भारतीय राजकारणाची दिशा बदलली. तसेच या सर्व गोष्टींनी एकाच दशकात तोंडवर काढल्याने याकाळात अस्थिरतेच्या राजकारणाचा अनुभव भारतीय राजकारणाला मिळाला. अशा राजकीय अस्थिरतेमुळे गेल्या दोनदशकात जवळपास दहा केंद्रीय सरकारे या ठिकाणी निर्माण झाली आणि हेच १९९० नंतरच्या भारतीय राजकारणातील बदलाचे किंवा परिवर्तनाचे द्योतक आहे.

**संदर्भ:**


१. Paul Brass, The Politics of India Since Independence, Cambridge Uni. Press
२. य.दि.फडके, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारण, विचारवेध संमेलने— अध्यक्षीय भाषण
३. सुहास पळशीकर, ‘जमातवाद, धर्मनिरपेक्षताआणिलोकशाही’, प्रतिमाप्रकाशन २००६.
४. स्माज प्रबोधन पत्रिका, क्र. २०६ एप्रिल—जून २०१४.
५. स्माज प्रबोधन पत्रिका, क्र. २०७जूलै—सप्टेंबर २०१४.
६. सकाळ वर्तमानपत्र १ ऑगस्ट २०१३.